# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २९, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री** | |
| **(३)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(४)** | **कामगार मंत्री** | |
| **(५)** | **उद्योग मंत्री** | |
| **(६)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(८)** | **क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री** | |
| **(९)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

-----------------------------------

## मुंबईत बनावट पदवी प्रमाणपत्र घेतलेल्या डॉक्टरांचे परवाने रद्द करणेबाबत

**(१) * ७२६८६ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईत कोणतीही वैद्यकीय शैक्षणिक अर्हता नसलेल्या व्यक्तींनी वैद्यकीय महाविद्यालय तसेच महाराष्ट्र वैद्यकीय आयोग (एमएमसी) या दोन्ही संस्थांना अंधारात ठेवून बनावट प्रमाणपत्रे मिळविल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, परदेशामधून वैद्यकीय पदवी मिळवून मायदेशी आलेल्या विद्यार्थ्यांना भारतात वैद्यकीय सेवा करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय आयोग (एमएमसी) नियमानुसार आवश्यक असलेली परीक्षा न देता एमएमसी मधील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने बनावट प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका उमेदवाराने प्रख्यात महाविद्यालयाचे बनावट प्रमाणपत्र दिनांक २० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास एमएमसीकडे सादर केल्यानंतर एमएमसीने या प्रकरणी चौकशी समितीची स्थापना करुन परदेशी विद्यार्थ्यांना बनावट प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी एका कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट पदवी प्रमाणपत्र घेतलेल्या डॉक्टरांचे परवाने रद्द करणे तसेच या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

परंतु, सन २०१५, २०१७ व २०१८ या कालावधीत परिषदेच्या दोन कर्मचाऱ्यांनी परदेशामधून वैद्यकीय पदवी मिळवून मायदेशी आलेल्या विद्यार्थ्यांना अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे नोंदणी देण्याची शिफारस करून परिषदेशी संबंधित अधिनियम व नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी परिषदेने संबंधित दोन कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्टात आणलेली आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी दोषी आढळलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांनी मा. उच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका दाखल केली असल्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यात शासकीय कार्यालय, आश्रम शाळा व जिल्हापरिषद शाळांवर बसविण्यात आलेले सोलर सिस्टिम कार्यान्वित करणेबाबत

**(२) * ७२९०९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यात सन २०११ मध्ये शासनाने कोटयवधी रुपये खर्च करून शासकीय कार्यालय, आश्रम शाळा, जिल्हापरिषद शाळांवर तसेच सन २०२१ मध्ये जिल्हापरिषदेच्या १०८ शाळांवर सोलर सिस्टिम बसविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी अद्याप सोलर सिस्टिम कार्यान्वित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असे असतानाही केवळ सिस्टिमचे फोटो काढून देयके मंजूर करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सिस्टिम कार्यान्वित करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

• रावेर (जि. जळगाव) येथील शासकीय कार्यालयांवर सन २०११ मध्ये सोलर सिस्टिम बसविण्यात आले नाही.

• शासकीय आश्रम शाळा लालमाती, ता.रावेर येथे सन २०११ मध्ये सोलर सिस्टीम बसविण्यात आले होते, हे खरे आहे.

• जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२० अंतर्गत अपारंपारिक ऊर्जा विकास या योजनेतून रावेर तालुक्यातील १७ जिल्हा परिषद शाळांवर सोलर सिस्टिम बसविण्यात आले होते.

(२) व (३) हे खरे नाही.

• शासकीय आश्रम शाळा लालमाती, ता.रावेर येथील सोलर सिस्टिम कार्यान्वित करण्यात आले होते. तथापि, नैसर्गिक आपत्तीमुळे (वादळामुळे) सदरहू सिस्टिमधील काही युनिट बंद पडले आहेत.

• रावेर तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या १७ शाळांपैकी १६ शाळांमध्ये सोलर सिस्टीमची उभारणी करण्यात आली असून तेथे नक्तमापन प्रणाली कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,जानोरी,ता. रावेर येथील काम तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सामान्य रुग्णालयात विविध साहित्य खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) * ७२१९७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सामान्य रुग्णालयातील बालरोग चिकित्साशास्त्र विभागात विविध साहित्यांची बाजारमूल्यांपेक्षा दुप्पट दराने खरेदी करुन गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ईसीआरपी-२ या योजनेतंर्गतही कोटयावधी रुपयांची खरेदी करुन गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२ ) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## महाड (जि.रायगड) एम.आय.डी.सी. मधील प्रसोल कंपनीत विषारी वायूची गळती होऊन कामगाराचा झालेला मृत्यू

**(४) * ७४६१६ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) एम.आय.डी.सी. मधील प्रसोल कंपनीत विषारी वायूची गळती होऊन झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू तर चार कामगार जखमी झाले असल्याचे दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करणे तसेच अशा घटनांवर आळा आणणे तसेच मृतांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या घटनेची चौकशी करण्यात आलेली आहे. महाड एम.आय.डी.सी (जि.रायगड) प्रसोल कंपनीमध्ये दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजी कारखान्याच्या DETC (डायईथिल थायोफॉस्फोरिक क्लोराईड) प्लान्टच्या तळमजल्यावर असलेल्या बॉक्स फिल्टरमधून हायड्रोजन सल्फाईड ($H_2S$) व सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) ह्या विषारी वायूची गळती झाल्याने तेथे काम करणाऱ्या पाच कामगारांना त्याची बाधा झाली होती. तसेच त्यापैकी एका कामगाराचा मृत्यू झाला आहे.

या घटनेत कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-A(२) (a) आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ७३-H (१) चे उल्लंघन आढळून आले असल्याने, मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग, जिल्हा- रायगड यांचे न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच सदर दुर्घटनेबाबत पोलीस विभागामार्फत भारतीय दंड विधान कलम ३०४ (अ), ३३७, २८६, २८४, ३४ अन्वये दि.०५.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या दिनांक २७/१०/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर कारखान्यास उत्पादन बंदचे आदेश बजावले आहेत. सदर आदेशाप्रमाणे सदर कंपनी व्यवस्थापनाने नवीन उत्पादन करणे बंद केल्याचे कळविले आहे.

अपघात झाल्यानंतर कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे देण्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारे सदर कंपनीचे अभिलेख सादर करण्यास कंपनीच्या व्यवस्थापनास उप आयुक्त, कामगार यांनी कळविले आहे.

मृतांच्या कुटुंबियांना राज्य कामगार विमा योजने अंतर्गत नोंदणीकृत (ईएसआयसी नं. ३४१७०६४७३९) असल्याने त्याच्या वारसास पेन्शन मिळणार आहे. त्यानुषंगाने संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्यामार्फत राज्य कामगार विमा कार्यालयास दिनांक ३०/११/२०२३ च्या ईमेलव्दारे कळविण्यात आले आहे.

कामगाराच्या वारसास रु.१,५०,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे. तसेच अतिरिक्त सानुग्रह अनुदान रु.३,००,०००/- मृत कामगाराच्या वारसास देणार असल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे.

चार बाधित कामगारांना उपचारासाठी पनवेल येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर चारही कामगारांना घरी सोडण्यात आले.

बाधित कामगारांच्या औषधोपचाराचा सर्व खर्च कारखाना व्यवस्थापनाने केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंध (जि. पुणे ) येथील जिल्हा रुग्णालयात मोतिबिंदू शस्त्रक्रियेदरम्यान काही रुग्णांच्या डोळयात लेन्स टाकल्या नसल्याबाबत

**(५) * ७२७२० श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि. पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात नेत्रशल्यचिकित्सा विभागात माहे एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीत केलेल्या सुमारे दोन हजारांहून अधिक मोतिबिंदू शस्त्रक्रियांपैकी जवळपास २५ रुग्णांच्या डोळयात लेन्स टाकल्या नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, औंध येथे माहे एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीत झालेल्या २१५९ मोतिबिंदू शस्त्रक्रियांपैकी २५ रूग्ण हे Aphakic असल्याने व त्यांना Secondary IOL Lens बसवून दृष्टी देता येत असल्याने सदर रुग्णांना योग्यवेळी संदर्भित सेवा करून Secondary IOL बसविण्यात आले असून त्यांना दृष्टी प्रदान करण्यात आली आहे. आजतागायत मोतिबिंदू शस्त्रक्रिया झालेल्या सर्व रुग्णांना लेन्स बसविण्यात आलेल्या आहेत.

(२) माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये माहिती अधिकार अंतर्गत दिलेल्या उत्तरानुसार सर्व रूग्णांना लेन्स बसविण्यात आल्या आहेत. ज्या २५ रूग्णांना Normal Lens (PCIOL) बसविण्यत आलेल्या नाहीत त्यांना Secondary IOL बसविण्यात येऊन दृष्टी प्रदान करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील रुग्णांचे वाढते मृत्यू रोखण्याकरिता करावयाची उपाययोजना

**(६) * ७७५६० श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात गेल्या अडीच वर्षांत १२४ पेक्षा जास्त रुग्णांचा मृत्यू झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रुग्णालयांमध्ये होणाऱ्या मृत्यू संदर्भात ठोस उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयास भेट देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांनी येरवडा प्रादेशिक रुग्णालयास भेट देऊन उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील रुग्णांचे वाढते मृत्यू रोखण्यासंदर्भात कार्यवाही करणेसह यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथे मागील अडीच वर्षात ३० मृत्यू झालेले आहेत. उर्वरीत ९४ मृत्यू हे प्रादेशिक मनोरुणालय, पुणे येथून सर्वोपचार रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या रुग्णांचे वयोवृध्दनुसार जडणा-या व्याधीमुळे झालेले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी यांनी दि.०७/१०/२०२३ रोजी ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे भेट देऊन त्याठिकाणी प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथील उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांचा व मृत्यू झालेल्या रुग्णांचा आढावा घेतला आहे. तसेच रुग्णांचे मृत्यू टाळण्यासाठी मनोरुग्णालयांमध्ये अत्यावश्यक पुरेसा औषधसाठा व साधनसामुग्रीसह सेवासुविधा २४ तास उपलब्ध ठेवण्याच्या तसेच रुग्ण अचानक गंभीर आजारी पडल्यास त्यास संदर्भित करण्यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका २४ तास उपलब्ध ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय महिला वसतिगृहांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करणेबाबत

**(७) * ७५५०९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शासकीय महिला वसतिगृहांमध्ये मोठया प्रमाणात सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वसतिगृह इमारतींची दुरवस्था, स्वच्छतागृह व स्वयंपाकगृहांची अस्वच्छता, पुरेशी वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसून कालबाह्य औषधांचा पुरवठा तसेच सुरक्षिततेचा अभाव इत्यादी अनेक बाबींमुळे वसतिगृहातील महिलांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय महिला वसतिगृहांमध्ये पुरेशा सोयी-सुविधा उपलबध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) राज्यातील शासकीय महिला वसतिगृहांमध्ये सद्य:स्थितीत सोयीसुविधांचा अभाव निदर्शनास आला नाही. तसेच वसतिगृहांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे ही निरंतर चालू राहणारी प्रक्रिया असल्याने आवश्यकतेनुसार वसतिगृहात सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येते.
(२) सद्य:स्थितीत शासकीय महिला वसतिगृहांच्या इमारती, स्वच्छतागृहे व स्वयंपाकगृहे यांची दुरवस्था झालेली नसून तेथे नियमितपणे दुरुस्ती व साफसफाई करण्यात येते. कालबाह्य झालेली औषधे वेळोवेळी नष्ट करण्यात येतात. तसेच वसतिगृहातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात. सबब, वसतिगृहातील महिलांना गैरसोयीचा सामना करावा लागत नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) शासकीय महिला वसतिगृहातील महिलांना मूलभूत गरजा, वैद्यकीय सेवा, समुपदेशन तसेच इतर आवश्यक त्या सर्व सेवा पुरविल्या जातात. स्वयंरोजगार, प्रशिक्षण, शिक्षण, विवाह, नोकरी, कौटुंबिक पुनर्वसन या द्वारे महिलांचे पुनर्वसन केले जाते.

राज्यातील शासकीय महिला वसतिगृहांमध्ये अनेक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी मागणीनुसार तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई येथे बुलेट ट्रेनच्या कामादरम्यान कामगाराचा झालेला मृत्यू

**(८) * ७८२२२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई येथील एम.एम.आर.डी.ए. मैदानावर बुलेट ट्रेनच्या कामादरम्यान क्रेनवरील लोखंडाचा फटका बसून श्री. उपेंद्र यादव या कामगाराचा दिनांक १२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रेन रात्रीच्या वेळेस हलविण्याची परवानगी नसल्याने कामगार श्री.उपेंद्र यादव यांनी नकार दिला असतानाही कंत्राटदाराने जबरदस्तीने काम करण्यास भाग पाडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार कंत्राटदाराविरूध्द कारवाई करणेबाबत तसेच मृत कामगाराच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, अंशत: हे खरे आहे.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई येथील एम.एम.आर.डी.ए. मैदान, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे मुंबई-अहमदाबाद या बुलेट ट्रेनच्या अंडरग्राउंड स्टेशनचे कामकाज सुरु असताना दिनांक ०९.११.२०२३ रोजी पहाटे सुमारे २.००

वाजता हायड्रॉलिक क्रॉलर माऊंटन क्रेन मागे घेत असताना रिगर म्हणून काम करणारे श्री.उपेंद्र प्रसाद यादव, वय वर्षे-२७ या कामगाराच्या पोटावर क्रेनच्या चैनचा लोखंडाचा तुकडा लागून ते गंभीर जखमी झाल्याने त्यांचा रूग्णालयामध्ये वैद्यकीय उपचारादरम्यान त्याच दिवशी पहाटे ०५:२० वाजता मृत्यू झाला.

(२) व (३) सदर अपघाताशी संबंधित कंत्राटदार यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० अन्वये कलम ३०४- ऐ अंतर्गत गुन्हा (FIR) क्र. ०६७३, दि.११.११.२०२३ रोजी वांद्रे-कुर्ला संकुल पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल केलेला असून सदर प्रकरणाबाबतची त्यामध्ये नोंद आहे.

सदर बुलेट ट्रेनच्या अंडरग्राउंड स्टेशनचे बांधकाम हे नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. (मुख्य आस्थापना) यांचे मुख्य कंत्राटदार मे. मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रा लिमिटेड व मे. हिंदुस्थान कंस्ट्रंशन कंपनी लि. यांचेकडून नियुक्त उपकंत्राटदार मे. एनरजेटीक पीपल प्रायव्हेट लिमिटेड, यांच्या मार्फत सुरू आहे. सदर आस्थापनेकरीता समुचित शासन हे केंद्रशासन असल्याने त्याबाबतची कार्यवाही उप श्रम आयुक्त, (केंद्रीय), सायन, मुंबई यांचे कार्यालयामार्फत करण्यात येत असून केंद्रीय श्रम आयुक्त कार्यालयातील रिजनल लेबर कमिश्नर यांनी दि.२८.११.२०२३ रोजी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ च्या कलम ३९ व नियम २११ अन्वये सदर आस्थापनेस भेट देऊन अपघाताबाबत चौकशी केली असून त्याअनुषंगाने त्यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

उक्त प्रकरणातील मृत कामगाराच्या नातेवाईकास कंत्राटदारामार्फत तात्काळ मदत म्हणून रक्कम रू. १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार) देण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील कंत्राटदार आस्थापनेने मे.आय.सी.आय.सी.आय.लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांचेकडे विमा पॉलीसी (क्रं.४०१०/२८७४०५९०९/००/०००) घेतलेली असून त्यानुसार सुमारे रू. १७ लाख इतक्या रक्कमेचा दावा त्यांचेकडे दाखल केले असल्याचे क्षेत्रिय श्रम आयुक्त (केंद्रीय) यांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनधिकृतरित्या सुरु असलेल्या प्रयोगशाळांवर कारवाई करणेबाबत

**(९) * ७३९६६ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये परावैद्यक परिषदेमध्ये नोंदणी नसलेल्या व्यक्ती व संस्थांद्वारे अनधिकृतपणे प्रयोगशाळा सुरू असल्याची धक्कादायक बाब दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध चाचण्या तज्ज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत नसल्यामुळे अनेक वेळा रुग्णांना चाचण्यांचे चुकीचे अहवाल दिल्यामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे आजमितीस केवळ ४,९३० रक्ताच्या चाचण्या करणाऱ्या योग्य शैक्षणिक पात्रता असलेल्या तंत्रज्ञांनी नोंदणी केलेली असून त्यापैकी काही नोंदणीधारक तंत्रज्ञ पैशासाठी अनधिकृत प्रयोगशाळा चालकास स्वतःचे नाव वापरण्याची परवानगी देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत प्रयोगशाळांवर गुन्हे दाखल करणेबाबतचे सविस्तर निवेदन प्रशासक, महाराष्ट्र परावैद्यक परिषदेने पोलीस महासंचालक यांना माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

(३) महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे आजमितीस ५४३३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ नोंदणीकृत असून या नोंदणीकृत तंत्रज्ञांचे नाव अनोंदणीकृत लॅबोरटरी चालकांकडून वापरण्यात येत असल्याबाबत शासनाकडे अथवा महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नाही.

(४) व (५) अनोंदणीकृत /बेकायदेशीर प्रयोगशाळांवर गुन्हे दाखल करण्याबाबतचे सविस्तर निवेदन महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडून पोलिस महासंचालक यांना दि. ०४.०८.२०२३ रोजी सादर करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड शहरातील दत्तनगर भागात अंगणवाडीमध्ये निकृष्ट दर्जाचा**
**पोषण आहाराचा पुरवठा झाल्याबाबत**

**(१०) * ७२५४८ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील दत्तनगर भागात अंगणवाडीमध्ये देण्यात येणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असून त्यात अळया आढळल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक १०.१०.२०२३ रोजी संबंधित अंगणवाडी च्या अंगणवाडी सेविकेने आहाराची गुणवत्ता व चव पाहूनच लाभार्थ्यांना ११.४५ ते १२.०० वा. सुमारास आहार वितरीत केला होता. आहार वितरीत केल्यानंतर लाभार्थ्यांकडून आहाराच्या दर्जाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नव्हती. तथापि, संध्याकाळी ५.३० वाजता आहारामध्ये अळी निघाल्याची तक्रार एका व्यक्तीकडून प्राप्त झालेली होती. परंतु, प्रत्यक्षात सकाळी आहार वाटतांना लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नव्हती. तथापि, तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित अंगणवाडीतील इतर लाभार्थ्यांच्या घरी चौकशी केली असता लाभार्थ्यांची आहाराबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, प्रकल्पातील इतर २७२ अंगणवाडयामध्येही आहाराबाबत चौकशी केली असता आहाराबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित अंगणवाडी केंद्रात पुरवठा झालेला आहार प्रादेशिक शासकीय आरोग्य प्रयोगशाळा येथे तपासणी करिता पाठविण्यात आलेला आहे. प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच, दरदिवशी गरम ताजा आहार प्राप्त झाल्यानंतर अंगणवाडी सेविकांनी आहाराची गुणवत्ता तपासून आणि चव घेतल्यानंतर, चव चांगली असल्यानंतरच सदर आहार लाभार्थ्यांना वितरीत करण्यात यावा असे निर्देश बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यात जलस्वराज्य - २ कार्यक्रम विहित कालावधीत न राबविल्याने निधी समर्पित केल्याबाबत**

**(११) * ७२११४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात जलस्वराज्य -२ कार्यक्रम राबविण्याचा व त्यामध्ये भीषण पाणी टंचाई असलेल्या ५८ गावांचा समावेश करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ४ वर्षापूर्वी निवड झालेल्या या गावांमध्ये साठवण टाक्या बांधकामाचा निर्णय घेण्यात आला असल्याचे तथापि त्यापैकी सदर ५८ गावांमध्ये शासकीय अधिकाऱ्यांनी ही योजना विहित कालावधीत न राबविल्यामुळे व दरम्यानच्या काळात या योजनेस जागतिक बँकेने मुदतवाढ देण्यास नकार दिला असल्याने केंद्र शासनाने सदर योजनाच बंद केली असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेस जागतिक बँकेचे आर्थिक पाठबळ असतांना केवळ संबंधित अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे जागतिक बँकेचा निधी समर्पित करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन टंचाईग्रस्त ५८ गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय.

शासन निर्णय क्र.जस्वप्र-०७१६/प्र.क्र.९८/पापु-११,दि.२०.०९.२०१९ अन्वये जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत ५८ टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या यांच्याकरीता करावयाच्या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यामध्ये रायगड जिल्ह्यातील ५२, रत्नागिरी जिल्ह्यातील ०२ व सातारा जिल्ह्यातील ०४ योजनांचा समावेश होता.

(२) व (३) जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची मुदत ही सन २०१४ पासून दि.३१.३.२०२० अशी होती.

जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत दि.२० सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये ५८ टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या यांच्याकरीता करावयाच्या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

तथापि, दि.२१ सप्टेंबर, २०१९ पासून राज्य विधानसभा निवडणुक आचार संहिता लागू झाल्यामुळे तत्कालीन परिस्थितीत या योजनांच्या अंमलबजावणी करिता निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली नाही. यामध्ये अधिका-यांच्या अकार्यक्षमता/निष्काळजीपणाची बाब आढळून आलेली नाही.

जलस्वराज्य-२ कार्यक्रमाचा कालावधी दि.३१ मार्च, २०२० पर्यंतच असल्याने जागतिक बँक व केंद्र शासन यांना जलस्वराज्य-२ कार्यक्रमास मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार सदर कार्यक्रमास काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सहा महिन्यांची म्हणजेच दि.३०.९.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यामध्ये केंद्र शासनाच्या अर्थ कार्य विभागाकडून मुदतवाढ कालावधीत कुठल्याही नवीन कामांची निविदा प्रसिद्ध करण्यात येणार नाही या अटीच्या अधीन राहून मुदतवाढ दिली. तसेच या योजनांच्या अंमलबजावणीसाठी जागतिक बँकेकडून कर्ज स्वरुपात निधी प्राप्त होणे अपेक्षित होते, तथापि, जागतिक बँक यांनी मार्च, २०२० अखेर पुर्ण झालेल्या कामांनाच केवळ निधी (वित्तीय प्रतिपूर्ती) वितरीत करण्याच्या अटीवर कार्यक्रमास मुदतवाढ दिली. यास्तव सदर योजनांची निविदा प्रक्रिया जलस्वराज्य-२ अंतर्गत करण्यात आली नाही.

सदर कार्यक्रमास मिळणारे अर्थसहाय्य प्रोग्राम फॉर रिझल्ट या साधनांतर्गत उद्दीष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी निगडीत होते व स्वतंत्र यंत्रणेमार्फत उद्दीष्टपूर्तीची खात्री झाल्यानंतर जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त होत होते. यामुळे जागतिक बँकेचा निधी समर्पित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदरच्या ५८ टंचाईग्रस्त गावे, वाडया-वस्त्यांचा समावेश जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना/स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनांतर्गत समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारणेबाबत

**(१२) * ७६७६० श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-कसारा मध्य रेल्वे मार्ग, समृध्दी महामार्ग तसेच शहापूर-मुरबाड-नगर या महामार्गाचे जाळे असल्याने सतत अपघात होत असून त्यामध्ये कित्येकदा अपघातग्रस्तांचा मृत्यू होत असल्याच्या घटना वारंवार घडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळावे यासाठी शहापूर तालुक्यात ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व रेल्वे प्रवासी संघटना यांनी शासनाकडे वारंवार केली असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी खर्डी (ता.शहापूर) येथे पाच एकर जमीन उपलब्ध करण्यात आली असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, शहापूर यांचेकडून सांगण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यात मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-कसारा रेल्वेमार्ग, समृद्धी महामार्ग तसेच शहापूर-मुरबाड-अहमदनगर ही महामार्ग जात असल्याने अपघातग्रस्त रुग्ण जिल्हा रुग्णालय ठाणे, उपजिल्हा रुग्णालय भिवंडी, उपजिल्हा रुग्णालय शहापूर, ग्रामीण रुग्णालय खर्डी, ग्रामीण रुग्णालय गोवेली व मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर येथे दाखल होत असतात. गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील जे.जे. रुग्णालय अथवा केईएम रुग्णालय येथे संदर्भित केले जाते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) उपसंचालक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांनी दि.२२.०६.२०२२ पत्रान्वये खर्डी, जि. ठाणे येथे ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयास पाठविला होता, तथापि, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.१८.०९.२०२० नुसार ट्रॉमा केअर युनीट स्थापन करण्याबाबत निश्चित केलेल्या

निकषाची पुर्तता होत नसल्याबाबत आयुक्तालयाने दि.०६.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आय.टी.आय. संस्थामधील पदभरतीमध्ये झालेल्या गैरव्यवहार

**(१३) * ७२४९२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आय.टी.आय. संस्थांमधील सुरु असलेल्या पदभरतीमध्ये ७७२ पदांची भरती संशयास्पद असून यात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच उमेदवाराने आठ पदांसाठी वेगवेगळया प्रकारची बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर करुन परीक्षा देत गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी उमेदवार व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.
(२) याअनुषंगाने सदर पदभरतीसंदर्भात दै. लोकमत वृत्तपत्राच्या छत्रपती संभाजीनगर आवृत्तीमध्ये दिनांक १९/०८/२०२३ रोजी बातमी प्रसिद्ध झाली होती.
(३) प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणी दरम्यान उमेदवाराने ऑनलाईन अर्जात चुकीची माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास किंवा उमेदवार संबंधित प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करू न शकल्यास किंवा ते खोटे/बनावट आढळून आल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येणार असल्याबाबतचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १९/०८/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे.

संचालनालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकाची दखल घेऊन दै. लोकमत वृत्तपत्राने यापूर्वी दि. १९/०८/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक २१/०८/२०२३ रोजी संचालनालयाची उपरोक्त भूमिका स्पष्ट करणारी बातमी प्रसिद्ध केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडयांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करणेबाबत

**(१४) * ७२८२२ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा),**

**श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक लाख दहा हजार अंगणवाडयांपैकी बहुतांश अंगणवाडयांची दुरवस्था झाली असून रस्ते, पाणी, वीज यासारख्या पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडयांमध्ये वीजेची सुविधा नसणे, स्वत:च्या इमारती नसल्याने अंगणवाडया शाळा परिसर, समाजमंदिर, सभागृह, देवालय, भाडयाच्या जागेत किंवा झाडाखाली भरविल्या जात असल्याने तिनही ऋतूत विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडयांच्या इमारतींना मंजुरी देऊन निधी उपलब्धतेसह पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत राज्यात ११०४४६ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.:-

| प्रकल्प | एकूण अंगणवाडी संख्या | स्वत:च्या इमारती मधील अंगणवाडी केंद्र संख्या | भाडयाच्या इमारती मधील अंगणवाडी केंद्र | शाळा इमारती मधील अंगणवाडी केंद्र | इतर | पाण्याची सुविधा उपलब्ध असलेली अंगणवाडी केंद्र | स्वत:च्या इमारतीत वीज सुविधा उपलब्ध असलेली अंगणवाडी केंद्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ९४८४६ | ७०८२५ | ८३१९ | ७७६४ | ७९३८ | ७९०१० | ३३८४७ |
| नागरी | १५६०० | ३९९ | १३६५० | ४२९ | ११२२ | १५६०० | ३९९ |
| एकूण | ११०४४६ | ७१२२४ | २१९६९ | ८१९३ | ९०६० | ९४६१० | ३४२४६ |

राज्यात ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही अशा अंगणवाडया भाडयाच्या इमारतीत/ ग्रामपंचायत / समाजमंदिर/ शाळा इ. ठिकाणी कार्यान्वित आहेत. तथापि, राज्यातील कोणतीही अंगणवाडी झाडाखाली भरविण्यात येत नाही.

(३) व (४) जलजीवन मिशन अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याकरिता नळजोडणी करण्यात येते. केंद्र शासनाकडून देखील अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता तरतूद करण्यात येते. शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी,२०२२ अन्वये महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बाल विकास करिता किमान ३ टक्के इतका निधी कायमस्वरूपी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये अंगणवाडी बांधकाम, अंगणवाडी केंद्रांना वीजपुरवठा, नलिकेद्वारे पाणीपुरवठा, अंगणवाडी केंद्रांची दुरुस्ती इ. कामांचा समावेश करण्यात आला आहे.

---------------

## ठाणे (जि.ठाणे) येथील मनोरूग्णालयातील मानसिक आजारातून बरे झालेल्या रुग्णांचे पुनर्वसन करणेबाबत

**(१५) * ७२२६६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) येथील मनोरूग्णालयात मनोरुग्ण बरे झाल्याचे प्रमाणपत्र १० वर्षांपूर्वीच दिलेले असूनही जवळपास २७९ रूग्ण रूग्णालयातच राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानसिक आजारातून बरे झालेल्या रूग्णांचे पुनर्वसन न करता त्यांना मनोरुग्णालयातच ठेवल्यामुळे त्यांच्या देखभालीसाठी शासनाचे आर्थिक नुकसान होत असून आवश्यकता पडल्यास गरजू मनोरुग्णांना रुग्णालयात प्रवेश मिळण्यास अडचणी देखील निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील ९७ मनोरुग्णांचा १० वर्षे वास्तव्य कालावधी पूर्ण झालेला आहे.मानसिक आरोग्य कायदा,२०१७ मधील कलम ९० नुसार या मनोरुग्णांचे ०२ स्वतंत्र मनोविकृती तज्ञाव्दारा विशेष मूल्यांकन केले असता यापैकी ७२ मनोरुग्ण हे Fit For Discharge असल्याचे दिसून आलेले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मानसिक आजारावरील उपचारानंतर मनोरुग्णांचे सामाजिक व कौटुंबिक पुनर्वसन होणे आवश्यक आहे. तथापि, यापैकी काही मनोरुग्ण हे वृद्ध, दिव्यांग, नातेवाईक अथवा कुटुंबिय हयात नसलेले, निवासी पत्ता सापडत नसल्याने किंवा पत्ता बदल झालेले, या वर्गवारीतील आहे. त्यामुळे अशा रुग्णांना मनोरुग्णालयातून Discharge करणे अमानवीय असल्याने त्यांचे पुनर्वसनाचे समस्या निर्माण झालेली आहे. अशा बरे झालेल्या व्यक्तीचे पुनर्वसन सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या मदतीने मनोविकृती क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थेकडे स्थलांतरण करण्याबाबतची नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांचे स्थळ चौकशी समिती (Spot Inquiry Committee) व्दारा दि. ३०.१०.२०२३ ते ०३.११.२०२३ पर्यंत मनोरुग्णालयातील अधिक वास्तव्य झालेल्या मनोरुग्णांसोबत व त्यांचे कुटुंबासमवेत प्रत्यक्ष चर्चा करुन चौकशी करण्यात आलेली आहे. यानुसार मानसिक आजारातून बरे झालेल्या रुग्णांच्या पुनर्वसनाबाबत सामाजिक न्याय विभाग व दिव्यांग आयुक्तालय यांचेसमवेत समन्वय साधून पुनर्वसन कार्यक्रमाची आखणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यात हत्तीरोग नियंत्रणात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत

**(१६) * ७३०५६ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार**

**(सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई वगळून १८ जिल्ह्यातील विशेषतः चंदपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, भंडारा, नांदेड, अकोला, नंदूरबार व पालघर या जिल्ह्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव कायम असून हत्तीपाय रुग्णांची संख्या ३०,३३४ तर अंडाशय वृध्दी रुग्णांची संख्या ७,२५६ आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन १९७५ पासून हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू असून सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये त्यावर मोफत उपचार होत असूनदेखील हत्तीरोग पूर्णपणे नियंत्रणात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन हत्तीरोग नियंत्रणात आणण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

१८ संवेदनशील जिल्ह्यांपैकी पुढील १० जिल्हे हत्तीरोग दुरीकरणाच्या अंतिम टप्प्यात आहेत- १) अकोला २) जळगाव ३) सिंधुदुर्ग ४) अमरावती ५) यवतमाळ ६) वर्धा ७) सोलापूर ८) लातूर ९) धाराशिव १०) ठाणे-शहापूर.

(२) हे अंशतः खरे आहे.

हत्तीरोग या आजारामध्ये दोन प्रकार आहेत - १) हत्तीपाय २) अंडवृद्धी.

• हत्तीपाय या आजारामध्ये एकदा पायाला सूज आलेनंतर त्यामध्ये फारशी सुधारणा होत नाही त्यामुळे या रुग्णांना ही लक्षणे शेवटपर्यंत दिसून येतात. त्यामुळे रुग्णसंख्या त्यांच्या मृत्यूनंतरच कमी होत असते.

• अंडवृद्धी प्रकारामध्ये अंडवृद्धी शस्त्रक्रिया करून अंडवृद्धी नियंत्रणात आणली जाते. सन ऑगस्ट, २०२३ मध्ये एकूण ५२३९ रुग्ण असून त्यामध्ये २१९६ रुग्णांची शस्त्रक्रिया करणेत आलेल्या आहेत.

(३) हत्तीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत-

• **सामुदायिक औषधोपचार मोहिम** - सध्या राज्यात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, पालघर, ठाणे, नंदुरबार व नागपूर या ठिकाणी फेब्रुवारी व ऑगस्ट, २०२३ मध्ये सामुदायिक औषधोपचार मोहिम घेण्यात आली. या सामुदायिक औषधोपचार मोहिमेत ३७,२५,३५५ लोकांना हत्तीरोग विरोधी गोळ्या वितरीत करण्यात आल्या.

• **विकृती व्यवस्थापन** - विकृती व्यवस्थापन (MMDP) कीटचे वाटप करण्यात आले. सन २०२२ मध्ये २४,५४३ इतके किट वितरीत करण्यात आले. तर सध्या ऑक्टोबर, २०२३ पर्यंत ९,६६३ किट वितरीत करण्यात आले असून किट वितरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

• **अंडवृद्धी शस्त्रक्रिया** - सन २०२२ मध्ये ३२५० तर ऑक्टोबर, २०२३ पर्यंत २१९६ अंडवृद्धी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

• **नियमित उपचार**-नियमित विशेष मोहीम तपासणीत आढळून आलेल्या हत्तीरोग संक्रमित रुग्णांची पडताळणी करून सदर रुग्णांना हत्तीरोग विरोधी गोळीचा नियमित उपचार देऊन समुपदेशन करण्यात आले.

• **डास नियंत्रण**-डास नियंत्रणाकरिता कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करून आढळून आलेले डास अळी दूषित कंटेनर रिकामे करणे अथवा अबेट टाकणे तसेच डास्योत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडणे, कोरडा दिवस पाळणे, डास विरोधी क्रीम, अगरबत्ती, मॅट इत्यादीचा वापर करून डासांपासून संरक्षण करणे या बाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते .

• समस्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये डासांपासून संरक्षण करण्यासाठी सन २०२१-२२ या वर्षात ४.५२ लाख कीटक नाशक भारीत मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले.

• **रात्र सर्वेक्षण**- यामध्ये हत्तीरोगग्रस्त भागातील रक्त नमुने रात्रीच्या वेळी घेऊन तपासण्यात येतात.

• **अळीनाशक फवारणी**- कार्यक्षेत्रातील निवडक हत्तीरोगग्रस्त भागात क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत डासांवर नियंत्रण ठेवणेकरीता अबेट, बीटीआय पावडर या रसायानांचा वापर करुन डासोत्पती स्थानांत फवारणी करण्यात येते.

• **कीटकशास्त्रीय सर्वेक्षण**- उपलब्ध किटक समाहाराकांमार्फत कार्यक्षेत्रातील निवडक भागातील घरांमध्ये डास पकडून त्यांचे वर्गीकरण करणे, डास घनता काढणे, डासांचे विच्छेदन करणे व डासोत्पत्ती स्थाने तपासणे इत्यादी कार्यवाही करण्यात येते.

• **जीवशास्त्रीय उपाययोजना** - गप्पी मासे सोडण्यायोग्य स्थाने उदा. बिनवापराच्या विहिरी, टाकी, कारंजे, मोठे डबके, तलाव, मोठे नाले इत्यादी ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली जाते.

• **आरोग्य शिक्षण** - कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमांद्वारे व प्रत्यक्ष भेटींमध्ये हत्तीरोगाचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पती, औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाय इत्यादीबाबत आरोग्य शिक्षण दिले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागात नवजात बालकांचे मृत्यू रोखण्याकरिता प्रसूतीगृहांची संख्या वाढवून सुसज्ज आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत

**(१७) * ७४८९१ श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवजात बालकांच्या मृत्यूच्या आकडेवारीनुसार दिवसाला ४० मृत्यू नोंदविले जात असून विशेषत: नागपूर, अमरावती, यवतमाळ, पुणे जिल्ह्यांमध्ये नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील २५ हून अधिक बालके १ महिन्यांहून कमी वयाची असून त्यातील ६ बालकांना श्वसनाचा त्रास होत असताना संबंधित रुग्णालयात कृत्रिम श्वसन यंत्रणा आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुसंख्य शासकीय प्राथमिक अतिदक्षता केंद्र (PICU) बालरोग व नवजात अतिदक्षता केंद्र (NICU) येथील वाढती रुग्ण संख्या, अपुरा कर्मचारी वर्ग आणि स्वच्छता व पायाभूत सुविधांचा अभाव इत्यादी अनेक कारणांमुळे गर्भवती महिलांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून त्यात नवजात बालकांचा दुर्देवी मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणेसह राज्यात नवजात बालकांचे मृत्यू रोखणे, ग्रामीण भागात प्रसूतीगृहांची संख्या वाढविणे तसेच सुसज्ज आरोग्य सुविधा पुरविण्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०२३ पर्यंत एकूण ४८७२ नवजात बालकांचे (० ते २८ दिवस) मृत्यू झाले आहेत. याप्रमाणे दर दिवशी २३ नवजात बालकांचा मृत्यू झाला असल्याचे दिसून येते. तसेच सर्वाधिक बालमृत्यूचे प्रमाण मुंबई, ठाणे, सोलापूर, अकोला व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये असल्याचे दिसून येते.

(२) एकूण नवजात मृत्यू (४८७२) पैकी ७९५ (१६%) बालकांचा मृत्यू हा श्वसनाचा त्रास होत असल्याने झाला आहे. राज्यात आजारी नवजात शिशुच्या उपचाराकरिता एकूण ५२ विशेष नवजात काळजी कक्ष स्थापन करण्यात आले असून त्या अंतर्गत श्वसनाच्या उपचाराकरिता CPAP मशीन आणि Surfactant उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच SNCU मध्ये बालरोग तज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक SNCU मधील वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारिका यांचे CPAP चे प्रशिक्षण राज्यस्तरावरुन घेण्यात आलेले आहे.

(३) PICU व NICU हे मुख्यत: राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत असून तेथे तज्ञांमार्फत आरोग्य सेवा देण्यात येते.

(४) राज्यात नवजात बालकांचे मृत्यू रोखण्याकरिता पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत-

• आजारी नवजात शिशुच्या उपचाराकरिता ५२ विशेष नवजात काळजी कक्ष सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत आहेत.

• सर्व आजारी नवजात शिशुकरिता शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत औषधे, तपासण्या तसेच वाहतूक लाभ देण्यात येतो.

• SAANS कार्यक्रमांतर्गत जंतुसंसर्ग झालेल्या नवजात शिशुंचे निदान व उपचार केले जातात

• प्रत्येक FRU असलेल्या आरोग्य संस्थांमध्ये आजारी नवजात शिशुकरिता New-born Stabilisation Unit (NBSU) व प्रत्येक प्रसूतिगृहात नवजात शिशु काळजी कक्ष (NBCC) स्थापन करण्यात आलेले आहेत

• नवजात बालकांची जन्मजात व्यंग तपासणी (Comprehensive New-born Screening) व उपचार केले जातात.

• गृहस्तरावर नवजात बालकांची काळजी (HBNC) कार्यक्रमांतर्गत आशामार्फत सहा गृहभेटी देण्यात येतात.

• MAA कार्यक्रमांतर्गत स्तनपानासंबंधी पालकांचे शिक्षण व समुपदेशन केले जाते.

• नियमित लसीकरण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये गंभीर आजारांचे निदान माफक दरात उपलब्ध करून देणेबाबत

**(१८) * ७१६६३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये औषधांप्रमाणे आजारांच्या निदानाच्या वैद्यकीय चाचण्यांसाठी लागणाऱ्या रिएजंटचीही कमतरता असल्यामुळे रुग्णांना जादा दराने चाचण्या कराव्या लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, औषधांप्रमाणे हाफकिन बायोफार्माकडून तपासण्यासाठी लागणारे रिएजंटही सन २०१९-२०२० पासून रुग्णालयांना रीतसर पाठविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळामध्ये निदान निश्चितीसाठी जिल्हानिहाय प्रयोगशाळा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात त्यावर कोणतीच प्रभावी अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील रुग्णांना गंभीर आजारांचे निदान माफक दरात सार्वजनिक रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांसाठी केंद्रीय पध्द्तीने राज्यस्तरावरून आवश्यक औषधी साहित्य (SDL/ SCL) तसेच प्रयोगशाळा साहित्य व वैद्यकीय साधन सामुग्रीची खरेदी केली जाते. सदर पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्यांमध्ये प्रयोगशाळा तपासणीकरीता आवश्यक रिएजंट व प्रयोगशाळा किट्स यांचा देखिल समावेश आहे. तसेच स्थानिक स्तरावरुन जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषदेच्या सेस फंड, राष्ट्रीय आरोग्य अभियान, केंद्र शासन वित्त आयोग निधी इत्यादी विविध योजनांद्वारे देखिल औषधी साहित्यांची खरेदी करण्यात येते. त्यामुळे शासकीय रूग्णालयांमध्ये औषधी व आजाराच्या निदानाच्या वैद्यकीय चाचण्यांसाठी लागणाऱ्या रिएजंटची कमतरता नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

हाफकीन बायोफार्मा यांचेकडून तपासण्यांसाठी लागणारे रिएजंट सन २०१९-२० पासून पाठविण्यात आलेले नाहीत. परंतु राज्यस्तरावरून सहसंचालक आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या विविध लेखाशिर्षांतर्गत २१- पुरवठा व सामग्री या उद्दिष्टाखाली मंजूर अनुदानातून राज्यातील सर्व शासकीय रूग्णालयांसाठी औषधी व साहित्यांच्या स्थानिक खरेदीकरीता अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सदर अनुदानातून स्थानिक बाजारातून वैद्यकीय चाचण्यांसाठी आवश्यक असणाऱ्या रिएजंटची खरेदी करून रूग्णांस उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

कोरोना आजाराच्या निदानाकरीता कोरोना काळामध्ये RTPCR प्रयोगशाळेची स्थापना जिल्ह्यांच्या ठिकाणी करण्यात आली होती. त्याद्वारे RTPCR चाचण्या करण्यात येत होत्या.

सद्य:स्थितीत केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शकसूचनांनुसार राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमधील प्रयोगशाळा चाचण्या मोफत करून देण्याकरीता मे.हिंद लॅब लिमिटेड (HLL) या सेवापुरवठादारामार्फत "महालॅब" प्रयोगशाळा संलग्न करण्यात आलेली आहे.

(४) सर्व शासकीय आरोग्य संस्थांमधून देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा निःशुल्क देण्याबाबतच्या शासनाच्या धोरणानुसार दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पासून सर्व शासकीय आरोग्य संस्थांमधून देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, तपासणी त्याबाबतचे रूग्णशुल्क निःशुल्क करण्यात आलेले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक २३ ऑगस्ट,२०२३ अन्वये सर्व शासकीय रुग्णालयांमधून करण्यात येणा-या तपासण्या, सेवा व उपचार निःशुल्क करण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे. त्यामुळे रुग्णांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असून रुग्ण उपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेतली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील इमारत बांधकाम ठिकाणी मजूरांचे झालेले मृत्यू

**(१९)** * **७८१७४ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील सावतानगर परिसरातील सुर्योदय कॉलनी येथे बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरुन पडून एका मजूराचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली तसेच शहरातील पाथर्डी फाटा येथील दामोदर नगर येथे बांधकाम सुरु असलेल्या नवीन इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरुन पडून कामगार श्री.हरिशचंद्र काशीनाथ खरात या मजूराचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून यापूर्वीही शहरातील सातपूर परिसरातील

धुवनगर येथील एका शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरु असताना एका मजूराचा पडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम सुरु असतांना कामगारांना सुरक्षेसाठी सुरक्षा पट्टा, हेल्मेट आणि संरक्षण जाळी पुरविण्याची गरज असतांना संबंधित बांधकाम व्यावसायिकाने कामगारांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ व कामगार सुरक्षा कायदा, १९४८ च्या सुरक्षाविषयक नियमांचे उल्लंघन करण्यात आले असल्यानेच सदरचा अपघात होवून कामगाराचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची घटना ही बांधकाम व्यावसायिकाने सुरक्षाविषयक उपाययोजना न केल्याने घडून आली असून महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देतांना सुरक्षाविषयक उपाययोजना संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून दिल्या जातात किंवा नाही याची खातरजमा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक शहरात सुरक्षा विषयक उपाययोजना न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर तसेच संबंधित बांधकाम प्रकल्पाने महाराष्ट्र कामगार सुरक्षा कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नात नमूद केलेल्या अपघाताच्या ठिकाणी क्षेत्रीय निरीक्षक तथा सरकारी कामगार अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन अपघाताबाबत तपासणी केली. त्याबाबत १) प्लॉट नं ८९ वैशाख सेक्टर, सुर्योदय कॉलनी, सावता नगर, सिडको कॉलनी, नाशिक २) सहज ब्लॉसम स्कूल अंड ज्युनिअर कॉलेज, शिवाजी नगर, मस्जिद समोर, सातपूर या बांधकामाच्या ठिकाणी १० पेक्षा कमी कामगार असल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशेर्ती) अधिनियम, १९९६, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशेर्ती) नियम, २००७ तरतुदी लागू होत नाहीत. तथापि, शिव प्राईड, दामोदर नगर, पाथर्डी फाटा, नाशिक या ठिकाणी उक्त अधिनियमातील तरतुदी लागू होत असल्याने उक्त अधिनियमांतर्गत निरीक्षण शेरे पारित करण्यात आले आहेत.

१. प्लॉट नं ८९ वैशाख सेक्टर, सुर्योदय कॉलनी, सावता नगर, सिडको कॉलोनी नाशिक येथील अपघाताबाबत संबंधित कंत्राटदार यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत कलम ३०४-अ अन्वये अंबड पोलिस स्टेशन, नाशिक शहर येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र.०५५८/२०२३ अंतर्गत दिनांक ०५.०९.२०२३ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

२. शिव प्राईड, दामोदर नगर, पाथर्डी फाटा, नाशिक येथील अपघाताबाबत आस्थापना मालक यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत कलम ३०४-अ अन्वये इंदिरा नगर पोलिस स्टेशन, नाशिक शहर येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र. २९५/२०२३ अंतर्गत दिनांक २०.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

३. सहज ब्लॉसम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शिवाजी नगर, मस्जिद समोर सातपूर येथील अपघाताबाबत संबंधित कंत्राटदार यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत कलम ३०४-अ, ३३८ अन्वये गंगापूर पोलिस स्टेशन, नाशिक शहर येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र. १२४/२०२३ अंतर्गत दिनांक १६.०५.२०२३ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील राणीगांव या गावाला पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणेबाबत

**(२०) * ७२९७५ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील राणीगांव या गावात मोठया प्रमाणात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी संबंधित जिल्हापरिषद तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मोठया प्रमाणात निधी खर्च करण्यात येवूनही अद्याप हा प्रश्न सोडविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेची प्रथम निविदा दिनांक २० ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्यासुमारास काढण्यात आली असून निविदेच्या जाचक अटी व शर्तींमुळे इतर कंत्राटदार बाद झाल्याने याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली असता नव्याने निविदा काढण्याचे आदेश शुध्दीपत्रकाद्वारे देण्यात आले असून यामध्ये देखील गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही .

(२) अंशत: खरे आहे, तथापि, सद्य:स्थितीत योजनेची निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आली आहे, सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.७.११.२०२३ रोजी देण्यात आला असून, योजनेच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

(३) आयुक्त, अमरावती यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रिया प्रलंबित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. तद्नंतर दि. ३०.८.२०२३ रोजी आयुक्त कार्यालयाकडून नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना मिळाल्याने जिल्हा परिषद स्तरावर निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देण्यात आले आहेत व योजनेचे काम सूरू करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळा (धा) (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे न करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत

**(२१) * ७३७६५ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळा (धा) (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी रुपये दोन कोटी रकमेच्या कामांचा कार्यारंभ आदेश दिनांक २७ जुलै, २०२२ रोजी देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावात पाण्याची तीव्र टंचाई असताना तसेच सदरहू काम कंत्राटदाराने १८ महिन्यांत पूर्ण करणे आवश्यक असताना योजनेचे काम सुरु न करता अग्रीम रक्कम रुपये ८५ लाखांची उचल घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंत्राटदाराकडून देयकाची रक्कम व्याजासह वसूल करुन त्यांचेविरुध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सरपंच, पिंपळा (धा), ता.अंबाजोगाई यांनी तहसिलदार, अंबाजोगाई यांच्याकडे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, पाणीपुरवठा यांच्याकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाणी पुरवठा योजना सत्वर कार्यान्वित करणेसह संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पिंपळा (धा) (ता.अंबाजोगाई, जि.बीड) पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ०२.०८.२०२२ रोजी देण्यात आलेले आहेत.

(२) होय हे खरे आहे.

जल जीवन मिशनअंतर्गत योजनेच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार कंत्राटदाराने उद्धरण वाहीनी व वितरण व्यवस्था या उपांगासाठी खरेदी केलेल्या साहित्यासाठी प्रथम धावत्या देयकात निविदा अटी शर्तीप्रमाणे रुपये ८५,०५,४८५/- इतकी अदायगी करण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडून याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला असून, सदर अहवाल प्राप्त होताच त्यानूसार नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील औषध निर्मिती कारखान्यात लागलेल्या आगीत कामगारांचा झालेला मृत्यू

**(२२) * ७७९८९ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीत क्षेत्रात असलेल्या ब्ल्यू जेट हेल्थकेअर या कारखान्यात झालेल्या बॉयलरच्या स्फोटात ११ कर्मचाऱ्यांचा होरपळून मृत्यू झाल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यामध्ये स्फोटांची मालिका आणि वायूगळती होत असल्यामुळे बेपत्ता कामगारांचा शोध घेऊन मदतकार्य करणे अवघड झाल्यामुळे पुणे येथून एन.डी.आर.एफ च्या टीमला मदत कार्यासाठी पाचारण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत महिन्याभरात ही दुसरी घटना असून सदर अपघातानंतर महाड औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कारवाई करुन मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाड औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीत क्षेत्रात असलेल्या मे. ब्लू जेट हेल्थकेअर लि., युनिट -३, प्लॉट नं.१/४–के,ॲडिशनल एमआयडीसी महाड या कारखान्यातील प्लांट क्रमांक ५ च्या तळमजल्यावरील फिल्टर ड्रायर (ANFD) मध्ये रसायनाच्या ड्राईंगचे काम सुरु असतांना सदर (ANFD) ड्रायरमध्ये दाब वाढल्यामुळे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२३ रोजी त्याचा स्फोट झाला व आग लागली आणि ती आग सर्वत्र पसरल्याने ११ कामगारांचा मृत्यू झाला.

(२) उक्त कारखान्यात झालेल्या स्फोटामुळे सदर इमारतीचा पहिल्या व दुसऱ्या मजल्याचा आर.सी.सी. स्लॅब, लोखंडी प्लॅटफार्म, यंत्रसामुग्री तळमजल्यावर कोसळली. तसेच त्या ठिकाणी साठवलेल्या ज्वलनशील रसायनांमुळे त्या प्लांट मध्ये आग लागून सर्वत्र पसरली व त्यामुळे काही ज्वलनशील रसायनांच्या ड्रम्सचा स्फोट झाला.

सदरहू घटनेतील अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी अडथळा निर्माण होत असल्यामुळे पुणे येथून एन.डी.आर.एफ. च्या टीमला मदत कार्यासाठी पाचारण करण्यात आले होते, हे खरे आहे.

(३) महाड औद्योगिक वसाहतीमध्ये दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजी मे. प्रसोल केमिकल्स प्रा.लि., महाड या कारखान्यात विषारी वायूची गळती झाल्याने तेथे एका कामगाराचा मृत्यू झाला आहे. सदर कंपनीतील जबाबदार अधिका-यांविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भविष्यात अशा घटना घडू नये या करीता सदर दोन्ही घटनेमध्ये कारखाना व्यवस्थापनांना कामगारांच्या सुरक्षिततेकरीता आवश्यक उपाययोजना सुचविलेल्या आहेत. तसेच योग्य त्या कायदेशीर कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत महाड औद्योगिक वसाहतीमध्ये प्रशिक्षण व मॉकड्रील्सचे आयोजन करुन कामगार व व्यवस्थापनामध्ये सुरक्षिततेबाबत जागृती करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) या प्रकरणी कारखाना अधिनियमातील तरतुदींच्या भंगाबाबत सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयात दोन फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ४० (२) अन्वये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने प्रतिबंधात्मक आदेशान्वये सदर जागेचा उत्पादन प्रक्रियेसाठी वापर करण्यास मनाई केलेली आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०७/११/२०२३ च्या आदेशान्वये सदर कारखाना तात्काळ बंद करण्याबाबतचे आदेश पारित केलेले आहे.

सदर घटनेत महाड एम.आय.डी.सी. पोलिसांनी कंपनीचे अधिकारी व ठेकेदाराविरुध्द दि.०७ नोव्हेंबर,२०२३ रोजी गुन्हा दाखल केला असून कारखान्याच्या देखभाल विभागाचे व्यवस्थापकास अटक केली आहे. तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ०३.११.२०२३ रोजी उपविभागीय दंडाधिकारी, महाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली असून त्यानुषंगाने तपासणी सुरु आहे.

सदर घटनेतील ११ मृत कामगारांपैकी ८ कामगार कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) अंतर्गत नोंदणीकृत असुन त्यानुषंगाने वारसदारास पेन्शन मिळण्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत ३ मृत कामगारांच्या वारसदारास देय नुकसान भरपाईची एकूण रु.३७,१५,५४०/- एवढी रक्कम आयुक्त, नुकसान भरपाई, महाड यांच्याकडे धनादेशाव्दारे जमा करण्यात आलेली आहे.

तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सदरहू घटनेमधील मृत कामागरांच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये ०५ लाख देण्याबाबतची पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत करण्यात येत आहे.

सदर घटनेतील किरकोळ जखमी झालेल्या कामगारांना त्याच दिवशी उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून, ५ कामगारांना प्रत्येकी रु. १ लाख आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या एका कामगारास रु. ५ लाख देण्याचे कारखाना व्यवस्थापनाने मान्य केले आहे. तसेच सर्व जखमी कामगारांच्या औषधपोचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापन करत आहे.

याशिवाय सदर अपघाताच्या घटनेमधील प्रत्येक मृत कामगारांच्या कायदेशीर वारसांस सानुग्रह अनुदानापोटी रुपये ३० लाख कारखाने व्यवस्थापनामार्फत देण्यात आलेले असून मृत कामगारांच्या वारसांना नोकरी देण्याबाबत कंपनी व्यवस्थापनाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.